पुण्य नगरी

# धरणगाव महाविद्यालयात सायबर सुरक्षेचे दिलेत धडे



**धरणगाव :** येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागामार्फत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कम्प्युटर सायन्स विभाग, क्विकहील फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर सेल यांच्या सहकार्याने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेविषयी विद्यापीठातील कम्प्युटर सायन्सेस विभागाच्या विद्यार्थिनी नेहा पाटील आणि जानव्ही सपकाळे यांनी मार्गदर्शन केले. सोशल मीडिया पब्लिक अकाउंट आणि ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, या विषयी सांगताना त्यांनी आपली प्रत्येक माहिती सोशल मीडियावर टाकल्याने होणाऱ्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उदय जगताप, तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. व्ही. ए. वारडे हजर होते. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. स्वप्निल खरे यांनी करुन आभार मानले. कार्यक्रमास डॉ. डी. एन. पाटील, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. एच. ए. भालेराव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. जे. पी. महाजन, डॉ. एस. एच. वाघमारे, प्रा. पूर्वा कुलकर्णी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचा विद्यार्थी विकास विभाग, संगणक शास्त्र विभाग आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

Jalgaon Edition
Aug 1, 2025 Page No. 03